**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.२५/२०१८</u>**
**<u>सा.क्र.१</u>**
**<u>निशाणी ३६ वर पुढे सुरु...</u>**

शपथेवर पुढे सुरु –
**<u>हरकतदार यांच्या मार्फत विधीज्ञ श्री. हमीद शेख यांच्यामार्फत उलटतपासः</u>**

५. माझे शिक्षण इ. १२ वी. पर्यंत झाले आहे. मला मराठी लिहीता, वाचता, बोलता येते. नबीला फिरदोस ही माझी बहिण आहे. मला माझ्या बहिणीच्या जिवनात घडलेल्या सर्व घटना तसेच तिची आत्ताची परिस्थीती याबाबत माहित आहे. नबीला फिरदोस ही सध्दा मो. इमरान शे. अन्वर याची पत्नी आहे, त्यांचे लग्न सन २०१० मध्ये झाले होते. नबीला फिरदोस हिचे पहिला लग्न सन २०१८ मध्ये मो. नदीम याच्या सोबत झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, आज रोजी माझी बहिण नबीला ही मो. नदीम याची पत्नी नाही. हे म्हणणे खरे आहे की, नबीला हिने मला दि.०४.०१.२०२५ रोजी माझ्या लाभात सदर केस चालविण्याबाबत मुखत्यारपत्र दिले आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.०४.०१.२०२५ रोजी नबीला ही मो. इमरान याची पत्नी होती. तसेच तिचे आधार कार्ड नबीला मो. इमरान याचे नावे बनविलेले होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी मला मुखत्यार पत्र लिहून दिले, त्यावेळी तिचे नाव नबीला फिरदोस मो. नदीम नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ज्या दिवशी मुखत्यार पत्र दिले, त्या मुखत्यार पत्रासोबत नबीला फिरदोस हिने तिचे आधारकार्ड नबीला फिरदोस मो. नदीम या नावाने लावले होते. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिच्याकडे माझ्या माहितीप्रमाणे नबीला फिरदोस मो. नदीम व नबीला फिरदोस मो. इमरान असे दोन आधारकार्ड आहेत.

६. मी नबीला फिरदोस हिच्यापेक्षा वयाने मोठा आहे. हे म्हणणे खरे आहे की, मो. नदीम याच्यासोबत माझ्या बहिणीचे लग्न सन २०१७ मध्ये झाले होते. सदर लग्न होण्यापुर्वी मो. इमरान तसेच अज्ञात लोकांनी इब्राहीम साहेब याच्याकडे सदर लग्न तोडण्याबाबत पत्र पाठविले होते अथवा नाही, याबाबत मला माहित नाही. नबीला फिरदोस हिचे मो. नदीम याच्या लग्नापुर्वी मो. इमरान हा माझ्या बहिणीला ओळखत होता, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिच्या लग्नाच्या पाच

महिन्यामध्ये तिचे पती मो. नदीम याने आत्महत्या केली होती, त्यावेळी माझी बहिण नबीला फिरदोस ही माहेरी होती. हे म्हणणे खरे नाही की, नबीला फिरदोस व तिचा पती मो. नदीम यांच्यामध्ये इमरान यांच्यावरुन वाद होत होते.

| | |
|---|---|
| **प्रश्न :** | तुमची बहिण नबीला फिरदोस हिने तिचा पती मो. नदीम मयत झाल्यानंतर ४ महिने १० दिवस मुस्लीम रितीरिवाजाप्रमाणे असलेली इद्दत तिच्या पतीच्या घरी राहून पुर्ण केली नाही हे खरे आहे काय ? |
| **उत्तरः** | नबीला फिरदोस हिने माहेरी राहून इद्दत कालावधी पुर्ण केला. |

७. हे म्हणणे खरे आहे की, नदीम याच्या मृत्युपश्चात त्याचे भाऊ, वडील हे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मो. नदीम याच्या नावे असलेल्या अचल संपत्तीचा तपशिल सदर केसकामी मी दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नदीम याच्या नावे असलेली मालमत्ता मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी बहिण नबीला फिरदोस हिने दि.०४.११.२०१८ रोजी मो. इमरान शे. अन्वर रा. सहारा नगर, वलगाव रोड, अमरावती याच्यासोबत लग्न केले. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिचे सद्याचे आधारकार्ड हे नबीला फिरदोस मो. इमरान या नावे आहे. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिचे मतदान यादीत नबीला फिरदोस मो. इमरान या नावाने नाव आहे. मो. इमरान याच्या शिधापत्रीकेवर नबीला फिरदोस हिचे नाव नबीला मो. इमरान या नावाने आहे अथवा कसे याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिला मो. इमरान पासून दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, नबीला फिरदोस ही सन २०१८ पासून मो. नदीम याची वारस नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नबीला फिरदोस हिचे खोटे आधारकार्ड लावून सदर प्रकरणात खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

८. हे म्हणणे खरे आहे की, नबीला फिरदोस हिस कोणत्याही प्रकारचा गंभीर आजार नाही. हे म्हणणे खरे आहे की, आज देखील नबीला फिरदोस ही कौटुंबिक तसेच नातेवाईकांच्या कार्यक्रमाला जात असते. हे म्हणणे खरे नाही की, नदीम यास कोणीही वारस नसल्याकारणाने नबीला फिरदोस हिने सदर केसमध्ये खोटे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे, तसेच त्यामध्ये तिला प्रश्नांना सामोरे जावे लागू नये म्हणून ती कोर्टात येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, नदीम याच्या मृत्युचे कारण नबीला फिरदोस हिस माहित

आहे तसेच त्यापासून पळ काढण्याकरीता ती न्यायालयात येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, नदीम याच्या मालमत्तेमध्ये वारस म्हणून हिस्सा मिळविण्याकरीता नबीला फिरदोस हिने खोटी केस दाखल केलेली आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– ०४.०५.२०२६**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE

Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2026.05.04 16:35:08 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**
**बाळापूर**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,** सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | ०४/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | ०४/०५/२०२६ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | ०४/०५/२०२६ |